**प्रेसनोट** **दिनांकः- २३/०३/२०१९**

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## विश्रामबाग पोलीस स्टेशनचे हद्दीतील मिसिंग मुलीचा तातडीने शोध घेतलेबाबत

दिनांक-२२/०३/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनचे हद्दीत राहणारे एक इसम रा. सदाशिव पेठ, पुणे यांनी कॉलेजमध्ये इयत्ता ११ वी चे शिक्षण घेत असलेली त्यांची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्षे, हिला दिनांक २२/०३/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा. कॉलेजमध्ये सोडले होते व सायंकाळी ०४.३० वा. तिला घेण्यासाठी गेले असता मुलगी कॉलेजमध्ये मिळुन आली नाही. त्यामुळे सदर मुलीची आई वय ४१, रा. सदाशिव पेठ, पुणे यांनी मुलगी हरविले बाबत नारायण पेठ पोलीस चौकीमध्ये तोंडी कळवून तिचा नातेवाईकांचे घरी शोध घेवून ती जर मिळुन आली नाही तर तक्रार देण्यास येईल असे सांगून निघून गेल्या.

वर नमुद महीला यांनी दिलेल्या त्रोटक माहितीच्या आधारे विश्रामबाग पोलीस स्टेशनकडील नारायण पेठ पोलीस चौकीच्या प्रभारी अधिकारी महिला पोलीस उप निरीक्षक स्नेहल थोरात व स्टाफने तातडीने सदर मुलीचा शोध घेण्याचे काम सुरु करुन त्यादरम्यान सदरची मुलगी ही कर्वेनगर येथील ब्रिजचे खाली बसलेली मिळुन आली. चौकशी दरम्यान त्यांचे घरगुती कारणाचे वादामुळे सदर मुलगी कोणासही काहीएक न सांगता स्वतःहुन निघुन गेल्याचे समजुन आलेले असुन सदर मुलीला तिचे पालकांचे ताब्यांत देण्यांत आलेले आहे.

( एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.